# महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासनाचा अंगिकृत व्यवसाय)

"उद्योग सारथी", मरोळ औद्योगिक क्षेत्र, महाकाली गुंफा मार्ग, अंधेरी (पूर्व), मुंबई-९३

क्र.मऔविम/भूविभाग/म.व्य.(भुमी)/ B43425 दिनांक : 21 APR 2017

## परिपत्रक

विषय : अपवादात्मक परिस्थितीत मुदतवाढ मंजूर करणेबाबत..
संदर्भ : परिपत्रक क्र.मऔवि/भुविभाग/कार्यासन-१/ए ७१२२२
दि. ०६.०३.२०१३

महामंडळाच्या संदर्भिय परिपत्रकातील सुधारीत धोरणानुसार, भूखंडधारकाच्या आवाक्याबाहेरील टाळता न येणा-या परिस्थितीतील (unavoidable circumstances/ beyond the control of allottee) प्रकरणांत काही अपवादात्मक परिस्थितीत पुढील मुदतवाढ अथवा भूखंड विकासासाठी सुधारित अथवा नव्याने कालावधी विनाशुल्क देण्याचे अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांना देण्यात आलेले आहेत.

महामंडळाच्या संचालक मंडळाच्या दि. २७.०२.२०१७ रोजी झालेल्या ३६९ व्या बैठकीतील ठराव क्र. ५६५० अन्वये झालेल्या निर्णयानुसार परिपत्रक क्र.मऔवि/भुविभाग/कार्यासन-१/ए ७१२२२, दि. ०६.०३.२०१३ मध्ये खालील बाबींचा समावेश करण्यात येत आहे-

अपवादात्मक परिस्थितीमध्ये भूखंडधारकाच्या आवाक्याबाहेरील टाळता न येणाऱ्या परिस्थितीमध्ये (unavoidable circumstances/ beyond the control of allottee) खालील बाबींचा समावेश करण्यात येत आहे. सदरहू बाबी विचारात घेऊन मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या पूर्वमान्यतेने भूखंड विकास कालावधी अथवा नव्याने विनाशुल्क कालावधी मंजूर करण्यात यावा-

१. संबंधित क्षेत्रांबाबत मा. न्यायालय/National Green Tribunal यांचेकडून विशेष निर्देश / स्थगिती आदेशामूळे झालेला विलंब.
२. ज्या उद्योगांना पर्यावरण ना हरकत प्रमाणपत्र (Environment Clearance) ची आवश्यकता असते, अशा उद्योगांना त्यांचा परिपूर्ण अर्ज पर्यावरण विभागाकडे वेळेत सादर केलेला असणे, तसेच पर्यावरण विभागाने कळविलेल्या त्रुटींची पूर्तता वेळेत केलेली असणे आवश्यक आहे.
३. पर्यावरण विभागाचे ना हरकत प्रमाणपत्रासाठी शासनाकडून झालेला विलंब विचारात घेऊन केवळ तेवढा सुधारीत विकास कालावधी विनाशुल्क मंजूर करण्यात यावा.

सदरहू धोरण प्रलंबित असलेल्या तसेच नव्याने प्राप्त होणा-या प्रकरणांकरीता लागू करण्यात येत आहे.

सदरहु परिपत्रक मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम यांचे मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

**(अण्णासाहेब मिसाळ)**
**सह मुख्य कार्यकारी अधिकारी**
**मऔविम, मुंबई**

प्रति,

१. सर्व विभाग प्रमुख, मऔविम, मुंबई.
२. अतिरिक्त मुख्य अभियंता, मऔविम, पुणे/नांदेड/नागपूर.
३. सर्व अधिक्षक अभियंता, मऔविम.
४. सर्व प्रादेशिक अधिकारी, मऔविम.

५. सर्व कार्यकारी अभियंता, मऔविम.
६. सह मुख्य/उप मुख्य लेखा अधिकारी, मऔविम, मुंबई/पुणे /औरंगाबाद/नागपूर.
७. महाव्यवस्थापक (भूमि)/महाव्यवस्थापक (भूसंपादन)/व्यवस्थापक (भूमि-१/२), मऔविम, मुंबई.
८. प्रशासकीय अधिकारी, मऔविम, मुंबई.
९. व्यवस्थापक (भूसंपादन-१/२), मऔविम, मुंबई.
१०. जनसंपर्क अधिकारी, मऔविम, मुंबई.
११. सर्व क्षेत्र व्यवस्थापक, मऔविम.
१२. म.औ.वि. महामंडळाचे सर्व संचालक.
१३. सर्व महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र.
१४. सर्व औद्योगिक संघटना.
१५. मुख्य मध्यवर्ती परिपत्रक नस्ती/मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम, कार्यालय मरोळ/जागतिक व्यापार केंद्र (डब्ल्यू.टी.सी.), कफ परेड, मुंबई